स्थायी समितीच्या **गुरूवार दिनांक 24–09–2015** रोजी **सायंकाळी 05–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 3. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 4. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 5. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 6. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 7. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 8. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 9. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 10. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 11. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 12. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 13. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 14. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 2. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 183:— प्रभाग क्र. 31 अ व ब मध्ये दहीबाजार मस्जिद, करंजीकर रोड व लाडपुरा अभिनंदन बडकुल ॲन्ड संघई यांचे घराजवळ सी.सी. पेव्हमेंटचे काम करण्याच्या कामास्तव रु. 29,99,895/— (अक्षरी एकोनतीस लक्ष नव्यांनऊ हजार आठशे पंच्यानऊ फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 184:— प्रभाग क्र. 13 अ व ब येथील संजय गांधी नगर, सुजाता नगर, जोशीपुरा, सोनारटोली येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रु. 29,99,340/— (अक्षरी एकोनतीस लक्ष नव्यांनऊ हजार तीनशे चाळीस फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 185:— प्रभाग क्र. 14 अ व ब येथे कुंदनलाल गुप्ता नगर येथे, विविध ठिकाणी सी.सी.रोडचे कार्य व पंचवटी नगर नामदेव नगर येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रु. 29,99160/— (अक्षरी एकोनतीस लक्ष नव्यांनऊ हजार एकशे साठ फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 186:— प्रभाग क्र. 15 येथील संतोष नगर,नागसेनवन नगर श्री. गोपीचंद कुमरे यांचे घराजवळ सी .सी .पेव्हमेंटचे काम करण्याच्या कामास्तव रू. 29,99,940/— (अक्षरी एकोनतीस लक्ष नव्यांनऊ हजार नऊशे चाळीस फक्त) प्राकालनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 187:— वित्तीय वर्ष 2015—2016 करीता म.न.पा. मंजूरी अंदाजपत्रकान्वये गांधी झोन महाल क्र. 6 करीता एकुण रू. 689.50 लक्ष मनपा स्थायी समितीने विविध पदांतर्गत (महसुली व भाडंवली) आवंटन केले आहे. या आधारे प्राप्त राशीची क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग निहाय व क्षेत्रीय कार्यालयातील म्हणजेच रू. 689.50 लक्षचे आवंटन प्रस्तावित केले आहे. सबब ठरावानुषंगाने रू. 689.50 लक्ष राशीचे क्षेत्रीय कार्यालयाचे वर्ष 2015—2016 च्या अंदाजपत्रकास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन पद क्र. A42330170704 या पदाचे पुनर्विनियोजन वगळून इतर पदाच्या पुनर्विनियोजनास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 188:— प्रभाग क्र. 41 महाल येथील पाताळेश्वर मंदिर ते वाकर रोड पर्यंत सिमेंट रोडचे बांधकामाबाबत पुढील प्रमाणे प्रश्न विचारात घेऊन,

(अ) एकूण रू. 46,53,983/— रकमेच्या सुधारीत प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

(ब) स्थापत्य कामाचे रू. 12,85,201/— रकमेचे उर्वरित कार्यादेश मंजुर निविदा दराने निविदाकार मे. रफीक अहमद रियाज अहमद, यांना मंजुर निविदा दराने निर्गमित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 189:— नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील पिवळी नदी, नाग नदी व पोरा नदी येथील पुररेषा प्रस्थापित करून निळी पुररेषा व लाल पुररेषा मार्क करण्या संबंधात प्राप्त निविदांपैकी डीआरए कंसलटंट प्रा.लिमी.यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 24 टक्के कमी दराची रू. 43,51,758/—रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करणे व पद क्र. ए 22001822602 अंतर्गत कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 190 :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर